# नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या राजकीय व सामाजिक योगदानाचा अभ्यास

**डॉ.संभाजी संतोष पाटील.** श्री.शि.वि.प्र.संस्थेचे साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालय, धुळे.

**प्रस्तावना** :— भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात नेमस्त हा एक प्रवाह होता. त्यातील महत्वाचे व्यक्तीमत्व म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले होय म्हणजेच आधुनिक भारतीय राजकीय विचारवंतामध्ये त्यांचे नांव अत्यंत महत्वाचे आहे. ज्यांची ओळख भारतामध्ये महात्मा गांधी यांचे राजकीय गुरू म्हणून होते आणि ज्याच्या बुध्दी आणि चातुर्याविषयीच खुद्द इंग्रज अधिकाऱ्यानाच हेवा वाटत असे त्यामुळे ते इंग्रजांबरोबरच भारतीय लोकांमध्ये सुध्दा ओळखले जाऊ लागले होते. सर्वसामान्य अशा भारतीय विचारवंतापैकी गोखले एक असून न्या.रानडयांचे शिष्य म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. महात्मा गांधीनी गोपाळकृष्ण गोखल्यांचा गौरव “भारताचा आदर्श समाजसेवक” या शब्दात केला आहे.गोपाळकृष्ण गोखल्यांचे जीवन स्फटीकाप्रमाणे शुध्द आणि सिहांप्रमाणे शौर्याचे होते. “राजकीय क्षेत्रातील संपुर्ण आणि स्वयंपुर्ण पुरूष” असा गोपाळकृष्ण गोखल्यांचा उल्लेख केला जातो. साधुत्वाचे सर्व गुण त्यांच्यात होते. राजकारण आणि अध्यात्म यांची सांगड घातली जावी अशी त्यांची तीव्र ईच्छा होती. फिरोजशाह मेहता, न्यायमर्ती रानडे, दादाभाई नौरोजी यांना व्यक्तीगत जीवन होते आणि त्यांनी देशाची सेवा केली. गोपाळकृष्ण गोखले यांना व्यक्तीगत जीवन नव्हते स्वार्थत्यागपुर्वक देशसेवा करण्याची परंपरागोखल्यांनी सुरू केली. राष्ट्रवादी उदारमतवादी व धर्मनिरपेक्ष ही त्यांची व्यक्तीवैशिष्टये म्हणून सांगता येतील. गोखले विचाराने क्रांतीकारक पण मार्गाच्या बाबतीत मवाळ होते. भारताला आधुनिक करण्याचा त्यांचा उद्देश होता.परिवर्तनात त्यांना हिंसा नको होती. नैतिक मुल्यांना त्यांनी महत्वाचे स्थान दिले. पण त्यांना सत्तेची कधी लालसा झाली नाही. सन १८९९ मध्ये त्यांनी मुंबई विधीमंडळामध्ये सभासद म्हणून निवड करण्यात आली. या काळात त्यांची शासनावर कठोर टिका केली. ब्रिटीशांच्या काळात भारतीयांची दु:खे वाढली. ते सर्वोच्च विधीमंडळाचे सदस्य होते ते वृत्तपत्र स्वातंत्र्यांच्या बाजूने होते. त्यांनी त्या काळात शासनास अनेक सुचना केल्यात. जमिनीची प्रत वाढविणे, ओळीत क्षेत्र वाढविणे, उ़द्योगसंस्थांना प्रोत्साहन देणे, तांत्रिक शिक्षणाचा प्रसार करणे, प्राथमिक शिक्षणाचा मोठया प्रमाणात विस्तार करणे. ब्रिटीश सरकारला भारतीय जनतेच्या मागण्यासंबंधी निवेदन देण्यासाठी गेलेल्या काँग्रेसच्या शिष्यमंडळात गोपाळकृष्ण गोखले यांचा समावेश होता. त्यांनी १२ जून, १९०५ रोजी सर्व्हट ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली. देशहिताचा विचार करणारी ही संस्था होती. मोर्लेमिंटो सुधारणा कायदा सन १९१९ या नावाने ओळखला जाणाऱ्या कायद्याच्या जडणघडणीत ना.गोखले यांचा फार मोठा वाटा होता. इंग्लंडमध्ये वास्तव्य करून या कामी त्यांनी बरीच शिष्टाई केली. सनदशिर राजकारणाचे गोखले खरे प्रवर्तक होते. अखेरच्या काळात कायदेभंगाच्या चळवळीसाठी त्यांचा विशिष्ट मर्यादेपर्यंत पाठींबा होता. राजकाणातील त्यांच्या कार्या व्यतीरिक्त एक थोर समाजसेवक म्हणून ते प्रसिध्द होते. अस्पृश्यता, जाती निर्मुलन, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री शिक्षण, शेतकऱ्यांचे प्रश्न या विषयी गोखले प्रयत्नशीर होते. या संबंधीचे विचार गोखले यांनी सुधारक, सार्वजनिक सभा, राष्ट्रसभा, समाचार इत्यादी वृत्तपत्रातुन मांडले. प्राथमिक शिक्षण मोफत असावे असे ते म्हणत आणि सर्व स्तरावरील लोकांना शिक्षण देणे सुलभ व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. प्रस्थापित यंत्रणेमधील दोष कशाप्रकारे दुर करता येतील याचा विचार करून त्या दिशेने प्रयत्न करण्याची त्यांची वृत्ती होती. गोपाळकृष्ण गोखले यांना स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय राजकारण आणि अर्थकारण यातील एक चाणाक्ष व मुत्सदी म्हणून ओळखले जाऊ लागले. देशसेवेसाठी अखंडपणे संपुर्ण आयुष्य खर्ची करणारा हा एक थोर आदर्शसेवक होता. त्यांचे विचार फाराच मोलाचे व उपयुक्त आहेत.

**संशोधनाचा उद्देश** :—नामदारगोपाळकृष्ण गोखले यांच्या राजकीय व सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा उद्देश आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे** :—

(१) नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

(२) गोपाळकृष्ण गोखले यांचे आर्थिक विचारांची माहिती जाणुन घेणे.
(३) गोपाळकृष्ण गोखले यांचे स्वदेशीविषयी विचार जाणून घेणे.
(४) गोपाळकृष्ण गोखले यांचे सामाजिक विचार जाणुन घेणे.

**संशोधन पध्दती** :—

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या राजकीय व सामाजिक योगदानाचा अभ्यास करतांना ऐतिहासिक नोंदी, इतर विचारवंतांनी नोंदविलेली मते यांची माहिती विविध साधनांद्वारे प्राप्त केलेली आहे. या लघुशोध निबंधासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, गौरवग्रंथ, वर्तमानपत्रे इत्यादी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून मुद्देसुद मांडणी करण्यात आली आहे.

**विषयाचे महत्व** :—

गोपाळकृष्ण गोखले हे थोर समाज सुधारक होते ते सर्वगुण संपन्न होते ते त्यांच्या विचारातुन दिसुन येते. पाश्चिमात्य उदारमतवादी विचार सरणीचा अभ्यास करून ती विचारसरणी अंगीकारून त्या विचारांचा अभ्यास भारतीय आशयातुन प्रगट करणारा हा महान विचारवंत होता. राष्ट्रात सुव्यवस्था आणि स्थैर्य असल्याशिवाय राष्ट्राची प्रगती होणार नाही असे त्यांनी सांगितले म्हणून ते सतत स्वातंत्र्यांसाठी, सुधारणा आणि हक्क यासाठी सतत प्रयत्नशिल होते. लोकांचे  जीवनाचे सर्वागीण परिवर्तन करणे हेच त्यांचे ध्येय होते त्यांचे विचार अत्यंत मुलगामी स्वरूपाचे होते. शक्तीशाली राष्ट्राची निर्मिती करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांचे विचार फारच महत्वाचे होते.

**नामदार गोखले यांचे राजकीय विचार** :—

गोपाळकृष्ण गोखले हे राजनितिज्ञ होते. राजकारणाप्रती त्यांचा उदारवादी दृष्टीकोन होता आणि नैतिकतेचा आग्रह होता. त्यांची अशी श्रध्दा होती की, ज्यांचे चरित्र चांगले आहे जो धार्मिक प्रवृत्तीचा असेल तोच देशाची खऱ्या अर्थाने सेवा  करू शकतो. त्यांचा दृष्टीकोन होता की, देशाची सेवा करण्यासाठी सार्वजनिक कार्य आणि राजकीय कार्य हे दोनच मार्ग आहेत. ना.गोपाळकृष्ण गोखले यांनी मांडलेल्या विविध संकल्पना तत्वज्ञानाच्या व विचारांच्या क्षेत्रात प्राधान्य पावतात अशा अमुर्त संकल्पनांना आकार देण्यासाठी जो निवांतपणाचा व दैनंदीन धकाधकीतुन मुक्त असे वास्तव्य त्यांच्या वाटयाला आले नाही. राजकीय कार्यसिध्दीतुन लोकांचे कल्याण साधणे हेच त्यांच्या राजकीय विचारांचे मुळ वैशिष्टये होते. त्यातुन त्यांनी राजकारण व समाजकारण केले. त्यांनी राजकारणाकडे जीवनाचे तत्व म्हणून पाहीले. त्यांनी आत्मबली—दान आणि त्यामार्फत राष्ट्रसेवेच्या उच्च आदर्शासाठी आत्मनिवेदन हा एकमेव मार्ग आहे हे सिध्द करून दाखविले तसेच मानवाचा नैतिक, बौध्दीक आणि शारिरीक योग्यता आणि त्यांचा विकास आणि त्यांची मुक्ती हीच प्रमुख कार्य त्यांच्या दृष्टीने होती. सार्वजनिक व राजकीय कार्यास जेव्हा राष्ट्रीय कार्य समजले जाईल तेव्हाच हे शक्य आहे असे त्यांचे मत होते. बंधुभाव व कष्ट सहन करण्याची वृत्ती यासारख्या जीवनाच्या पध्दतीशिवाय राष्ट्रवादाला शक्तीचे स्वरूप प्राप्त होऊ शकत नाही. गोखले मवाळ गटाचे असून घटनात्मक आंदोलनात त्यांचा विश्वास होता. बहिष्कारासाख्या जहाल मार्ग त्यांना आवडत नव्हता. जागरूकतेचे धोरण, मंदगतीने होणारा विकास आणि बुध्दीसंगत प्रगतीत त्यांचा विश्वास होता. उदारमतवादावर त्यांचा विश्वास होता ते म्हणत ब्रिटनमध्ये एका नव्या राजकीय धोरणांचा उदय होईल ज्यामुळे भारतास योग्य न्याय मिळेल. भारतीय जनतेच्या कल्याणाखेरीज इतर विषयांना कनिष्ठदर्जाचे समजले  जाते. परदेशात ब्रिटीशांवर झालेल्या दुर्व्यव्यवहारामुळे त्यांना जेवढा राग येई तेवढाच राग भारतीयांवर झालेल्या अन्यायामुळे येत असे. भारतीय जनतेचे देशात व परदेशात नैतिक व भौतिक कल्याणाच्या विकासासाठी गोपाळकृष्ण गोखले  प्रयत्न करीत असत. त्यांचा असा विश्वास होता की, मनात एक अशा विचारांची निर्मिती होईल ज्यामुळे सुशिक्षीत भारतीयांच्या मनातील विशाल भावना समजल्या जाऊ शकतील आणि त्यामुळे भारतीयांच्या दृष्टीने काही महत्वाचे कार्य केले जाऊ शकेल. गोपाळकृष्ण गोखले ही एक धर्मनिष्ठ व्यक्ती असल्यामुळे त्यांनी राजकारण आणि धर्माची सांगड घातली होती. धर्मनिरपेक्ष असलेले राजकारण त्यांना मान्य नव्हते. प्रामाणिकता, उच्च

चारित्र्य आणि सत्याचा अभाव असलेले राजकारण त्यांना मान्य नव्हते. नैतिकतेवर त्यांचा भर होता. कोणत्याही प्रकारचे परिश्रम करावे लागले तरीही सत्य सोडण्याची त्यांची तयार नव्हती. ब्रिटीशांच्या राजकीय शक्तीला गोपाळकृष्ण गोखले सर्वश्रेष्ठ मानीत. ब्रिटीशांमुळे भारतीयांचा अनेक प्रकारे फायदा झाला हेही ते मान्य करीत असले तरी भविष्यकाळातील स्वतंत्र भारताची स्वप्ने ते पाहत. देशातील जनतेचा अंतरात्मा आणि जनतेच्या उद्‌देशावर त्यांचा विश्वास होता यासाठी लागणारी शक्ती आणि विश्वास प्रत्येक व्यक्तीजवळ आहे. परंतु या प्रकारच्या भविष्याचा साक्षात्कार फक्त राजकीय शक्तीच्या सहकार्यानेच होऊ शकतो. गोपाळकृष्ण गोखल्यांची तीव्र ईच्छा होती की, ब्रिटीश व भारतात परस्पर साामंजस्य आणि सहकार्य निर्माण व्हावे यासाठीच परस्पर सामंजस्यांच्या भावनेला ते अधिक महत्व देत. जगातील इतर राष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करणे हिच भारताची आकांक्षा आहे आणि त्यासाठी ब्रिटीशांनी प्रयत्न करणे यातच त्यांचा मोठेपणा आहे. जबाबदारीच्या नोकरीपासुन भारतीयांना वंचित ठेवल्याने त्यांचे नैनिक अध:पतन होईल म्हणून भारतीयांना शासनाने अधिकाधिक भाग घेऊ दिला पाहीजे. नोकरशाहीत होणाऱ्या सत्तेच्या केंद्रीकरणाच्या धोरणांची त्यांनी टिका केली होती.

गोपाळकृष्ण गोखले यांनी शासन संस्थेच्या उद्‌दिष्टांबद्‌दल आणि कर्तव्याबद्‌दल काही विचार सांगितले आहेत.

(१) सार्वजनिक कल्याण करतांना मात्र शासनाने व्यक्तीच्या वैयक्तिक व धार्मिक क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करू नये त्यामुळे जनता ही शासनाला सहकार्य करेल विरोध करणार नाही.

(२) राज्यामधील संपुर्ण जनतेच्या सामाजिक, आर्थिक, नैतिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीची जबाबदारी शासनाची आहे.

(३) शासनात सर्व जनतेला प्रतिनिधीत्व मिळावे एका विशिष्ट गटाचे किंवा वर्गाचेच प्रतिनिधीच त्यात नसावे तर सर्व समाजाचे प्रतिनिधी शासनामध्ये असावेत व शासनाने संपुर्ण समाजसाठी त्यांच्या कल्याणासाठी काम करावे.

(४) शासन किंवा सरकार ही मानवाने तयार केलेली संस्था आहे. आपल्या इच्छेनुसार आणि आवश्यकतेनुसार त्यात मानव किंवा जनता यात परिवर्तन करू शकते.

गोपाळकृष्ण गोखले यांची राष्ट्रीय एकतेस महत्व दिले. हिंदु—मुस्लीम एकतेने भारताचे कल्याण साधता येईल असा त्यांना विश्वास होता अशी एकात्मता निर्माण झाली नाही तर भारताचा भविष्यकाळ अंधकारमय आहे. हिंदु—मुस्लीमांची एकता निर्माणा करण्यासाठी जे वादविवाद होते त्यापासुन गोखले दुर रहात कारण त्यामुळे हिंदु—मुस्लीमात सख्य निर्माण होण्याऐवजी कटुताच वाढत जाईल असा त्यांचा विश्वास होता. नामदार गोखले हिंदु मुस्लीम या दोघांनाही समान दृष्टीने पाहत असत. गोखले यांची धारणा होती की, भारताला राष्ट्र म्हणून काही भवितव्य पाहीजे असेल तर हिंदु व मुसलमान सहकार्याची भावना निर्माण होण्याची गरज आहे. त्यांच्या मते, काही मतभेद राहणारच असेल असे वागणे टाळले पाहीजे. यात अधिक जबाबदारी हिंदुची आहे असे सांगत. गोखले यांचा एक राष्ट्र या संकल्पनेवर विश्वास होता. हिंदुस्थान हे संघ अस्तित्व आहे हे त्यांनी प्रतिपादन केले. ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनांचा विकास होईल. राष्ट्रीय विकासासाठी भारतीय जनतेच्या सामाजिक क्षमतेत आणि त्यांच्या नैतिकतेत वाढ करणे आवश्यक आहे ते म्हणतात, सध्याचा जो संघर्ष सुरू आहे त्याचे नैतिक महत्व अस्तित्वात असलेल्या संघटना आणि संस्थानांच्या पुर्ननिर्मितीत नसुन त्यांच्या शक्तीचा वापर आपल्या जीवनासाठी करता येईल त्यालाच अधिक महत्व आहे. नैतिकतेवर आधारीत या उद्‌देशाने १५ जून १९१५ रोजी त्यांनी भारत सेवक समाज या संस्थेची स्थापना केली. तरूणांना जनता सेवेच्या कार्याकडे प्रवृत्त करणे हा त्यांचा महत्वाचा उद्‌देश होता. परस्पर सद्‌भावना सहकार्य निर्माण करणे, राष्ट्रीय प्रवृत्ती निर्माण करणे, घटनात्मक मार्गाने विकास करणे आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे, सेवा बलीदानाच्या मार्गाने राष्ट्रप्रेम निर्माण करणे, जनतेच्या राजकारणाचे शिक्षण देणे आदि कार्याबरोबरच स्त्री शिक्षणाद्वारे औद्योगिक चळवळी उभारणे, औद्योगिक विकासासाठी सहाय्य करणे आदि भारत सेवक समाजाची प्रमुख कार्ये होती. ही कार्यच भारत सेवक समाजाच्या सभासदांच्या जीवनाचे ध्येय

होते. ज्याप्रमाणे धार्मिक कार्यासाठी सर्वजण एकत्र येतात त्यासाठी राजकीय जीवनात अध्यात्मिक रूप देणे आवश्यक आहे. मातृभूमीसाठी स्वत:चे जीवन अर्पण करण्याची श्रध्दा प्रत्येकाच्या मनात असणे आवश्यक आहे. जनतेच्या मनात धार्मिक भावनेने देशासाठी कार्य करण्याचे प्रशिक्षण भारत सेवक समाज देईल आणि घटनात्मक मार्गाने भारतीय जनतेच्या हिताचे संवर्धन केले जाईल असे ध्येय भारत सेवक समाज सेवक समाजाने जनतेसमोर मांडले होते.

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचा नोकरशाही व प्रशासनबाबतचा दृष्टीकोन मांडलेला आहे. ब्रिटीश प्रशासनाबाबत गोखले विचाराने अनुकूल होते पण नोकरशाही विषयी त्यांची भूमिका संशयात्मक होती.

(अ) जेष्ठ सनदी अधिकारी निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या देशात निघुन जात असल्यामुळे त्यांना आलेल्या अनुभवाचा फायदाही त्यांच्याच देशाला मिळत असे.

(ब) भारतीय लोकांना प्रशासनातील कनिष्ठ जागेवरच काम करावे लागत होते.

(क) भारतातील नोकरशाही ही वंशश्रेष्ठात्वावर आधारीत आणि परकेपणाविषयी आदर आणि आत्मकेंद्रीत अशा स्वरूपाची होती.

(ड) त्यांच्या मनात सामान्य माणसांविषयी निरंतर व क्लेषभावना होती. त्यांच्या समास्यांबाबत अडचणीबाबत थोडीही आत्मीयता किंवा सहानुभूती नव्हती.

(इ) प्रशासनातील उच्च पदावर इंग्लडमधील लोकांचीच निवड करण्यात येत होती. ज्यांना भारताबद्दल पुरेशी माहिती सुध्दा नव्हती.

व्यक्तीच्या शिक्षण, शेती, आरोग्य, पाणीपुरवठा या क्षेत्रात शासनाचा महत्वपुर्ण सहभाग असतो. परंतु व्यक्तीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक विकासासाठी शासन हे एक साधन होय. कारण शासनसंस्था ही व्यक्तीने निर्माण केलेली संस्था आहे. या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट हे मानवाचे कल्याण करणे हे होय. शासन हे साध्य नसुन ते एक साधन आहे. शासन हे आधुनिकीकरणाचे महान साधन असून त्यांच्या अनेक बाजु आहेत. हिंदी मनाची अशी एक घडण करावयाची ती प्रगतीला पोषक ठरेल. नोकरशाहीने या देशात कल्याणकारी कार्यक्रम हाती घेऊन राष्ट्रउभारणीच्या कार्यातील आपला वाटा उचलावा. प्रगत राष्ट्राच्या बरोबरीने या राष्ट्राला उभे राहता येण्यासाठी जे आवश्यक आहे ते शासनाने करावे.

(२) **गोखले यांचे आर्थिक विचार** :—

भारत सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाच्या धोरणात जोपर्यंत समतोल धोरण स्विकारले जाणार नाही तसेच उत्पादनाची वितरण व्यवस्था न्यायपुर्णरितीने होत नाही तोपर्यंत आर्थिक प्रश्नांबाबत समाजात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे म्हणून आर्थिक धोरणात आणि वितरण व्यवस्थेत समतोल धोरण स्विकारले जावे या विचाराचे शोधले होते. त्यांचे आर्थिक विचार हे अत्यंत महत्वाचे आहेत. त्यांचे हे विचार अत्यंत मुलग्रामी स्वरूपाचे होते. कारण जेव्हा त्यांनी स्वदेशी ही कल्पना मांडली तेव्हा त्यांनी भांडवलासंबंधीचे विचार सांगुन सर्वांना या प्रवाहात सहभागी व्हावे त्याचप्रमाणे वेळप्रसंगी शासनाने सुध्दा आर्थिक मदत करावी प्रसंगी स्वदेशीचे संरक्षण करण्याचेही काम शासनाने करावे. त्यांनी काही घटकांचा विचार करून आर्थिकदृष्टया भारत कसा समृध्द होईल हे डोळयासमोर ठेऊन काही क्षेत्रांचा उल्लेख त्यांनी केला. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे व त्यावरच भारताचा विकास अवलंबुन आहे असे त्यांचे मत होते. शेतीचा विकास करावयाचा असेल तर योग्य वाटणी, सिंचन क्षेत्रात वाढ करणे, योग्य दराने कर्ज पुरवठा करणे, आधुनिक पध्दतीने शेती कशी करता येईल याची माहिती शेतकऱ्यांना देणे योग्य अशा प्रकारे बाजारपेठा व उत्पादीत मालाला योग्य दर मिळावे यासाठी शासनाने प्रयत्न करणे. शेतसारा हा प्रत्येक वर्षीच्या प्रश्नावरून ठरविण्यात यावा आणि तो जमिनीनुसार आणि पिकाच्या उत्पादनानुसार असावा. वेळप्रसंगी शेतसारा रद्द सुध्दा करावा. शेतीवर आधारीत जे कापड उद्योग व ज्युट उद्योग आहेत त्या सर्वांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहीती पुरवावी. जेणेकरून हे ऊद्योग प्रगती करू शकतील या उद्योगांना देखील भांडवल शासनाने पुरवावे असे गोखले म्हणतात. शेतीवर आधारीत प्रक्रिया उद्योगांना चालना सरकारने द्यावी त्यामुळे उद्योग व्यवसाय भरभराटीला येतील. देशाच्या

परिपुर्ण विकासासाठी कृषीबरोबर उद्योगांचाही विकास होणे आवश्यक आहे. देशात तयार होणाऱ्या कच्च्या मालाचे उद्योगांच्या माध्यमातुन प्रक्रियेद्वारे पक्क्या मालात रूपांतर करता आले म्हणजे आपल्या देशातील माल व पैसा येथेच भारतामध्ये राहील. त्यांचा आर्थिक दृष्टीकोन व्यापक असलेला आढळतो. भारतात शासनाने देशी उद्योगांना संरक्षण द्यावे असे म्हणतांनाच गोपाळकृष्ण गोखले परकीय मालावर आयात कर अधिक बसवायला हवा असे ते सुचवितात ते येथेच थांबत नाही तर शासनाच्या वाढत्या खर्चावर नियंत्रण लावले पाहिजे आणि या प्रकारे आयात—निर्यात यात संतुलन साधले पाहिजे. या मताचे ते होते. भारतीय रेल्वे मार्गावर होणाऱ्या अमाप खर्चाला त्यांनी विरोध केला होता. भारतीय चलनाच्या संबंधात निर्माण केलेल्या सुवर्ण कोषालाही त्यांचा विरोध होता.

(३) **गोखले यांचे स्वदेशाविषयी विचार** :—

स्वदेशी आंदोलनाचे समर्थन नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी केले होते. देशाप्रती उत्कट व व्यापक प्रेम व स्वदेशीचा अर्थ गोपाळकृष्ण गोखले यांना अपेक्षित होता. १९०५ च्या वाराणसी काँग्रेसमध्ये ते म्हणाले होते की, स्वदेशी आंदोलनाचे स्वरूप आर्थिक असले तरी ते एक देशभक्तीचेही आंदोलन आहे. जे काही श्रेष्ठ आदर्श आहेत त्यात स्वदेशीचा आदर्शही महत्वाचा आहे. मातृभूमीवरील असणारे प्रेम स्वदेशीच्या मार्गाने व्यक्त केले जाऊ शकते. स्वदेशीच्या स्पर्शाद्वारे मानवाला आनंद मिळतो. या चळवळीतील सर्वसाधारण जनतेला समजु शकणारी बाजु म्हणजे देशाच्या संबंधात विचार करणे म्हणजे स्वदेशी आंदोलन होय. स्वदेशी आंदोलनाने सर्वसाधारण मानवाला देशाप्रती विचार, त्याग आणि देश हितासाठी सहकार्य करण्याची सवय लागू शकते. भौतिकदृष्टया हे एक आर्थिक आंदोलन आहे. मोठया प्रमाणावर विदेशी वस्तुंच्या भौतिकदृष्टया हे एक आर्थिक आंदोलन आहे. मोठया प्रमाणावर विदेशी वस्तुंच्या त्यागाची प्रतिज्ञा केल्यास आपल्यालाही महत्वाचे ध्येय प्राप्त होऊ शकेल व त्यामुळे देशी वस्तुंच्या उत्पादनाची विक्री वाढेल. मागणीप्रमाणे पुरवठा वाढेल आणि देशी वस्तुंना प्रोत्साहन मिळेल. नामदार गोपाळकृष्ण गोखले मते स्वदेशाची सुरूवात ही आर्थिक क्षेत्रापासुन करावी लागेल. कारण ब्रिटीशांनी इतर क्षेत्रात सुधारणा केल्या असल्या तरी आर्थिक क्षेत्रात भारताची प्रचंड लुट केलेली आहे. ईस्ट इंडीयाच्या कारभारापासुन ब्रिटीशांनी भारताच्या उद्योगाची तोडमोड केलेली आहे. हे करण्यामागे त्यांचा हेतु ब्रिटीश उद्योगधंद्यात मदत करणे हाच होता. गोपाळकृष्ण गोखले यांचे मते ब्रिटीशांच्या पक्षपाती आयात निर्यातीच्या धोरणामुळे भारताचे दरवर्षी ३० ते ४० कोटींची लुट झालेली आहे. ब्रिटीशांनी जमीनीचे अनेक तुकडे केले ते म्हणतात स्वदेशी वस्तुंचा उपयोग करावा यासाठी सामजंस्यपणा स्वार्थाचा त्याग करणे, सहकार्य करणे इ.गुण आवश्यक आहे. स्वदेशी मालाच्या उत्पादनासाठी भांडवल, साहस आणि कौशल्य आवश्यक आहे. भारतात भांडवलाचा अभाव आहे. त्या महत्वाच्या प्रश्नाकडे गोखल्यांनी लक्ष वेधले होते. जो जो सहकार्याचा हात पुढे करेल त्याला स्वदेशी चळवळीत सहभागी करून घेतले पाहीजे कोणालाही वगळण्यापेक्षा सामावून घेण्यातच चळवळीचा भर असावा. सर्वांना ठराविक साच्याचे काम न देता प्रत्येका आपल्या निवडीप्रमाणे स्वदेशी कार्य आपल्या पध्दतीने करू द्यावे.

गोपाळकृष्ण गोखले स्वदेशीचा पुरस्कार करतात आणि बहिष्कार नाकारतात. त्यांच्या मते बहिष्काराचा मार्ग धोक्याचाही आहे. बहिष्काराबाबत आपले विचार मांडतांना ते अधिक वास्तवादी भुमिका मांडतात. आधुनिक तंत्रज्ञान, योग्य उत्पादन पध्दती, विक्री व्यवस्थापन आणि शासनाचे सहकार्य घेवून स्वदेशीचे उत्पादन वाढवावे आणि गरज पडल्यास परकीय मालावर बहिष्कार टाकावा. बहिष्काराचा मार्ग हा शक्यतो टाळावा. राष्ट्रीय शिक्षणाच्या नावाने सरकारी शिक्षणावर बहिष्कार टाकू नये. इंग्रजी शिक्षण आले तर जागतिक स्वरूपाचे ज्ञान मिळू शकेल आणि प्रगती साधता येईल सरकारी नोकऱ्यावर बहिष्कार टाकल्याने आपले नुकसानच जास्त होईल. हिंदी लोक नोकऱ्यांपासुन वंचित राहतील आणि आपला विकास होणार नाही. राजकीय बहिष्काराला तर गोपाळकृष्ण गोखले विरोध करित असून असा बहिष्कार तर अव्यवहार्य आहे. विधीमंडळ व म्युनिसिपल बोर्डावरील माणसांच्या जागांवर बहीष्कार घालणे सुध्दा त्यांना मान्य नाही. उलट राजकीय बहिष्कार न टाकता जे भारतीयया वेगवेगळया पदावर आहेत. त्यांनी

आपल्या अधिकाराचा जास्तीत जास्त उपयोग करून भारताला स्वयंपुर्ण व स्वतंत्र बनविण्याचा प्रयत्न करावा.

वाराणसी काँग्रेसमध्ये गोपाळकृष्ण गोखले यांनी ९ मागण्या मांडल्या होत्या आणि त्या मागण्यांचा पुर्ततेसाठी काही उपायही सुचविले होते.

(१) प्राथमिक शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात यावा.

(२) औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाचा विकास आणि प्रचार करण्यात यावा.

(३) देशातील ग्रामीण जनतेला कर्जापासुन सुट दिली जावी या मागण्यांद्वारे तत्कालीन मवाळांच्या राजकारणाचे स्वरूप स्पष्ट होते.

(४) विधान परिषदांची सुधारणा करून निवडलेल्या सभासदांचे प्रमाण वाढवून देण्यात यावे.

(५) इंडीया कौन्सीलमध्ये कमीत कमी तीन भारतीय सभासदांची नेमणूक केली जावी.

(६) देशातील सल्लागार परिषदांची निर्मिती जिल्हा पातळीवर केली जावी आणि जिल्हाधिकाऱ्यांचे महत्वाचे निर्णय होतांना या परिषदांचा सल्ला घेतला पाहीजे. (७) भारतातील न्यायालयीन नेमणूका वकील वर्गातुन केल्या जाव्यात.

(८) न्यायालय आणि कार्यकारीणीच्या कार्याचे विभाजन केले जावे.

(९) देशाच्या सैनिकी खर्चात कपात करण्यात यावी.

देशामध्ये जमा होणारा महसुल जनतेच्या नैतिक आणि भौतिक विकासाया कार्यावर खर्च करण्यात यावा. देशातील उत्पन्न वाढीसाठी सरकारने अधिक खर्च करावा या मताचे गोपाळकृष्ण गोखले होते.

(४) **नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे सामाजिक विचार** :—

गोपाळकृष्ण गोखले जरी मवाळ विचारसरणीचे होते तरी सामाजिक सुधारणा बाबत ते मुलाग्राही होते. समाजाचा विकास व समाजातील निस्वार्थी आणि सामाजिक जाणीव ज्या नागरिकांमध्ये आहे अशाच समाजातील जागृत लोकांकडुन होतो. समाजात कशा प्रकारे समाजसुधारक निर्माण व्हावेत त्यासाठी गोखले यांनी “भारत सेवक समाज” पुणे येथे स्थापन केला. या संस्थेचे मुख्य ध्येय म्हणजे सामाजिक सुधारणा करण्यासाठी आदर्श अशा प्रकारचे सुशिक्षीत नागरिक तयार करणे होय. भारत सेवक समाजात काम करणाऱ्यांच्या अंगी आवश्यक असणारे गुण देशाच्या सर्वागीण विकासासाठी मी माझ्यामध्ये असणाऱ्या सदगुणांचा वापर करून देशाला सर्वस्व अर्पण करण्यास तयार राहील. देशाची सेवा करतांना नि:स्वार्थीपणे सेवा करेल. सर्व भारतीय हे समान आहेत. जाती, धर्म, वंश, वर्ण,लिंग असा भेदभाव न करता कार्य करेल. मी भारत सेवक समाजाचा उद्देश जो आहे त्याची पुर्तता करण्यासाठी मी माझे सर्वस्व अर्पण करील. भारत सेवक समाजाद्वारे सुसंघटीत, शक्तीशाली, चारित्र्यसंपन्न भारत निर्माण करण्याचे उद्दिष्ट गोपाळकृष्ण गोखले यांचे मत होते.

(५) **शिक्षण विषयक विचार :—**

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी शिक्षणासंबंधी विशेष आस्था होती. राजकीय कार्यात पर्दापण करण्यापूर्वीही भारतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे. ब्रिटीश सरकार इंग्लंडमध्ये दरवर्षी शिक्षणावर पुर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. सरकारने शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरवावे. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी सांगितल्यानंतर लॉर्ड कर्सन यांनी प्रथमच भारतात शिक्षणविषयक धोरण निश्चित केले परंतु एवढयावर नामदार गोखले यांचे समाधान झाले नाही सरकारने प्राथमिक शिक्षण अनिवार्य तसेच नि:शुल्क करावे अशी मागणी त्यांनी १९१० मध्ये केली होती. सरकारला सादर केलेल्या निवेदनात त्यांनी पुढील गोष्टी सुचविल्या होत्या.

(१)अनिवार्य शिक्षणासाठी मुलांचे वय, जपानप्रमाणे ६ ते १०वर्ष ठेवण्यात यावे.

(२)अनिवार्य शिक्षण नि:शुल्क असावे,ज्यामुळे प्रत्येक व्यक्ती शिक्षण घेऊ शकेल

(३)शिक्षणविषयक धोरण निश्चित करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावे.तसेच या संस्थांनी आपआपल्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षण अनिवार्य घोषित करावे.

(४)मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण अनिवार्य असावे.

(५)शिक्षण हा विषय प्रांताकडे न देता केंद्राकडे असावा कारण प्रांताकडे उत्पन्नाची

साधने कमी असल्यामुळे ते शिक्षणावर अधिक खर्च करू शकत नाहीत.
(६)शिक्षण विषयक अहवाल सरकारने दरवर्षी प्रकाशित करावा.
(७)गृहविभागाचे अंतर्गतच शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी एक स्वतंत्र सचिव नेमण्यात यावा.

गोपाळकृष्ण गोखले यांनी भारतात शिक्षण प्रसारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. तसेच त्यांना स्त्री शिक्षण संबंधीचे विचार पुर्णता मान्य होते. समाजात असणारी हलाखीची स्थिती, मागासलेपणा, अंधश्रध्दा, दारिद्रय, रूढी व परंपरा हे सर्व संपवायचे असेल तर स्त्रीशिक्षण आवश्यक आहे. बालविवाह, पडदा पध्दती, सतीप्रथा या जर थांबवायच्या असतील तर त्यासाठी स्त्रीशिक्षण महत्वाचे आहे. स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी शाळा व महाविद्यालयाची संख्या वाढविणे त्याचप्रमाणे शिक्षीका निर्माण होणारी महाविद्यालये सुरू करणे, स्त्रीयांचा विचार करून त्यांना अनुसरून अभ्यासक्रम तयार करावेत. स्त्रीयांचे नैसर्गिक गुण विकसीत होतील असे शिक्षण त्यांना द्यावे. स्त्रीयांच्या दैनंदीन जीवनात त्या शिक्षणाचा उपयोग व्हावा असे शिक्षण द्यावे.

**मुल्यमापन :—**

गोपाळकृष्ण गोखले हे मवाळवादी नेते होते. राष्ट्रवादी, उदारमतवादी व धर्मनिरपेक्षता ही त्यांची व्यक्ती वैशिष्टये म्हणून सांगता येतील. भारताला आधुनिक करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यांना हिंसा मान्य नव्हती. नैतिक मुल्यांना त्यांनी महत्व दिले. त्यांचा अभ्यास, मुत्सद्दीपणा, निश्चय, चर्चा करण्यातील कौशल्याने त्यांनी ब्रिटीशांना हैराण करून सोडले होते. नविन सामाजिक, राजकीय व्यवस्थेचा पाया त्यांनी भारतात घातला. राष्ट्र मजबुत करणे आवश्यक आहे असे गोखले मानत. भारतास मजबुत केले नाही तर भारताचा राष्ट्रवाद शक्तीशाली पायावर उभा करता येणार नाही. भारतीयांनी कठोर परिश्रम केले, बलीदान केले, राष्ट्रीय चारित्र्याची उभारणी केलीतर राष्ट्र मजबुत होईल, त्यांनी हिंदु—मुस्लीम एकतेची गरज प्रतिपादन केली. गोखले स्वत: धार्मिक होते पण ते धार्मिक गोष्टी निष्ठतेच्या विरोधात होते. व्यक्ती स्वातंत्र्याचे त्यांनी समर्थन केले आहे. विकेंद्रीकरण व प्रतिनिधींच्या हातात सत्ता असावी या मताचे ते होते.अध्यात्मिक राजकारण करणारा हा पहिला नेता होता. त्यांच्या व्यक्तीमत्वात मुत्सद्दीपणा आणि योग्य प्रशासक या गुणांचा सहभाग होता. या गुणांमुळे ते आपल्या काळातील सर्वोत्तम संसदपटू ठरले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

(१) प्रा.कुलकर्णी बी.वाय., भारतीय राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातुर,
(२) डॉ.कळंबे दिनकर एस.,भारतीय राजकीय विचारवंत, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
(३) प्रा.चोपडे किसन, भारतीय राजकीय विचार, विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद.
(४) प्रा.कुलकर्णी बी.वाय. , भारतीय राजकीय विचारवंत, श्री.विद्या प्रकाशन, पुणे.